# परिपत्रक क्रमांक १४८/२०२०

## (अत्यंत महत्वाचे)

**संदर्भः-** १) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील पत्र जा.क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ६०/२०/तांशि-१, दि. १९ मार्च, २०२०.

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. समय/२०२०/प्र.क्र.३५/१८ (र. व. का.) दि. १८ मार्च, २०२०.

३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक १४५/२०२० (जा. क्र. कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/१५८/२०२०, दि. १९.०३.२०२०.

४) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020.

५) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र जा.क्र. F.No. 1-14/2020(Website), dtd. 21.03.2020.

६) डॉ. मोहन खताळ, सहसंचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र जा.क्र.उशिसं/कोरोना/मवि-१/२०२०/३८१९/४०४२, दि. २३.०३.२०२०.

७) विद्यापीठ परिपत्रक क्र. १४६/२०२० जा. क्र. कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/१६०/२०२०, दि. २३.०३.२०२०.

८) गृह विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. ४०-३/२०२०/DM-I (A), दि. २४.०३.२०२०.

९) महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि. २५.०३.२०२०.

उपरोक्त संदर्भांकित पत्र क्र.४,५ व ६ अन्वये प्राप्त निर्देशास अनुसरून संदर्भ क्र.७ वर नमूद परिपत्रकान्वये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक प्रशाळा/विभाग/ प्रशासकीय विभाग, विद्यापीठाची अमळनेर, धुळे व नंदुरबार येथील उपकेंद्रे सोमवार, दि. २३ मार्च, २०२० ते मंगळवार दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

याबाबत संदर्भ क्र. ८ व ९ अन्वये अनुक्रमे गृह विभाग, भारत सरकार व महाराष्ट्र शासनाकडून नव्याने प्राप्त आदेश तथा सूचनेनुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभाग/विद्यापीठ परिसर/विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग तसेच विद्यापीठाची अमळनेर, धुळे व नंदुरबार येथील उपकेंद्रे येथील आस्थापनेवर काम करणारे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणूचा (कोव्हीड-२०१९) संसर्ग होऊ नये व त्याचा प्रादुर्भाव/प्रसार वाढू नये याकरीता प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभाग/विद्यापीठ परिसर/विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग, वसतिगृहे तसेच विद्यापीठाची अमळनेर, धुळे व नंदुरबार येथील उपकेंद्रे, मंगळवार दि. १४.०४.२०२० पर्यंत बंद राहतील.** या काळात सर्व शिक्षक, अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी घरी बसूनच आवश्यक ती शैक्षणिक/प्रशासकीय कामे करावीत असे आदेश पारित करण्यात येत आहेत.

तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता विद्यापीठ कार्यालयास एखाद्या शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांची गरज भासल्यास कुलसचिव/विभागप्रमुखांच्या आदेशानुसार संबंधित शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयामध्ये उपस्थित राहणे बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

...२...

उपरोक्त बाबी लक्षात घेता, **विद्यापीठाच्या परिसरात कोणत्याही कारणास्तव जमाव/मेळाव्याच्या स्वरूपात जनसमुदाय एकत्रित येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्या अनुषंगाने कोणतेही कार्यक्रम उदा. चर्चासत्रे, परिसंवाद, सांस्कृतिक, जनजागृती कार्यक्रम, विविध बैठका, उजळणी वर्ग इ. कार्यक्रमांचे आयोजन पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत करु नये. (या संदर्भात मा. कुलगुरू महोदय यांची पूर्वपरवानगी घेतलेली असली तरी वरील बाबीचे गांभिर्य लक्षात घेऊन नियोजित सर्व कार्यक्रम रद्द करण्यात यावेत).**

तसेच संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचेकडील पत्र जा.क्र. कबचौउमवि/७अ/ कोरोना/ परीक्षा स्थगिती/कु.१५०/२०२०, दि. १६ मार्च, २०२० अन्वये दि. १७ मार्च, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत आयोजित केलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्याबाबत व या कालावधीतील परीक्षांचे सुधारित वेळापत्रकाबाबत शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाद्वारा आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा (लेखी व प्रात्यक्षिक) ह्या दि.१४ एप्रिल,२०२० पर्यंत स्थगित करण्यात येत असून, सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या आयोजनाबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार वेळोवेळी आढावा घेऊन, त्या अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, संशोधक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वत:चे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी व संपर्क पत्ता संबंधित विभागप्रमुखांकडे सादर करावा. अत्यावश्यक सेवा **(पाणीपुरवठा, सामान्य प्रशासन [वाहनचालक, साफसफाई सेवा, सुरक्षा, मजुर व कामगार पुरवठा ह्या दृष्टीने], विद्युत व आरोग्य केंद्र इ.)** पुरविणाऱ्या प्रशासकीय विभागप्रमुखांनी या बाबत त्यांच्या स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

सदरचे निर्देश हे दि. १४.०४.२०२० पर्यंत लागू राहतील.

तरी सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा. संचालक/विभागांचे प्रमुख व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदर परिपत्रक आपल्या अधिनस्थ शिक्षक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे तसेच सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

आदेशावरून,

जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना(कोव्हीड-१९)/ ९६५ /२०२० (प्रा. भा. व्यं. पवार)
दि. २८.०३.२०२० **प्र. कुलसचिव**

प्रति,

१. विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/विभागांचे प्रमुख,
२. सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी, कबचौउमवि., जळगाव.
३. मानद संचालक, प्रस्तुत विद्यापीठाचे प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर.
४. कार्यकारी संचालक, प्रस्तुत विद्यापीठाचे महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे.
५. नियंत्रक अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठाचे एकलव्य प्रशिक्षण केंद्र, नंदुरबार.
६. मा.रेक्टर/वसतिगृह अधिक्षीका/सहायक वसतिगृह अधिक्षक, मुलांचे व मुलींचे वसतिगृह, कबचौउमवि., जळगाव.

**प्रत माहितीसाठी.**

१. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
३. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
५. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.